पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०७/२०१९** वेळ - दुपारी **१२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **१०/०७/२०१९** रोजी दुपारी **१२.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३. मा.सुनिता हेमंत तापकीर
४. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे

या शिवाय मा.इंदलकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.खडतरे – उप अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

अ) दिनांक १३/३/२०१९, २७/३/२०१९, १०/४/२०१९, २४/४/२०१९, २६/६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक २६/६/२०१९ (कार्यपत्रिका क्रमांक ०२) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक – ४ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १०/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.सुनिता तापकीर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५ दि.११/०५/२०१५

विषय :- पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिण्णोत्तर १२.०० मी.रूंद रस्त्यापासुन ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै.व स.नं.१४ पै मधील २४ व १२ मी.रुंद ( पुर्व-पश्चिम ) रस्त्याचे भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १०/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.सुनिता तापकीर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१२/१५/२०१९ दि.२४/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे अधिसूचना क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीसर-२६१/नवि-२२, दि.११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टिएमपीएस-१८०५/१०५०/सीआर-७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०५/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिद्ध केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय

क्र.टीपीएस १८९२/१६०/प्र.क्र ५८/१२/पुनर्बांधणी क्र.२७/१२/ईपी मंजुरी/नवि-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.मौजे दापोडी येथील स.नं ०५ पै जागामालक श्री चंद्रकांत सोपान काटे व इतर यांनी टाऊन हॉल व बस टर्मिनस ने बाधित क्षेत्र नविन भूसंपादन अधिनियमाद्वारे मनपाचे ताब्यात देणेकामी अर्ज या विभागाकडे सादर केलेला आहे. तरी मौजे दापोडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील खालील तक्त्यात दर्शविल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.०३/२४ | टाऊन हॉल | ५ पै | ५०००.०० चौ.मी |
| २ | आरक्षण क्र .०३/२५ | बस टर्मिनस | ४ पै, ०५पै व ०६ पै | २९६०० चौ.मी |
| ३ | नियोजित रस्ता | १२.०० मी | | |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणांचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी , पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनार्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम -२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३ ) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( राजेंद्र किसनराव लांडगे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३२२/२०१९
दिनांक : १०/०७/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.